# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

**दिनांक ३०/५/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या औरंगाबाद मंडळाच्या १२७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री कुंडलिकराव नागरे. | सभापती, औरंगाबाद मंडळ |
| २. | मा.श्री.के.बी.गवळी. | मुख्याधिकारी तथा उप सभापती, औरंगाबाद मंडळ |
| ३. | मा.श्री.विश्वासराव उपासे. | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ४. | मा.श्री.बबनराव देशमुख | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ५. | मा.ॲड श्री जे.पी.पाटील. | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ६. | मा.श्री साहेबराव खरात. | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ७. | मा.श्री.संजय वाघचौरे | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ८. | मा.श्री.वामनराव राऊत | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ९. | मा.श्री.चाँदपाशा इनामदार | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| १०. | मा.डॉ.श्री.डी.डी.शिंदे | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ११. | मा.श्री.राजेश्वर चव्हाण | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| १२. | मा.सौ.शैलजा गायकवाड | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| १३. | मा.श्री शेख मुदस्सीर,<br>सहाय्यक नगर रचनाकार,<br>उप संचालक, नगर रचना,<br>यांचे प्रतिनिधी | सदस्य प्रतिनिधी. |
| १४. | मा.श्री सिकंदर अली,<br>कार्यकारी अभियंता, म.न.पा.<br>मा.आयुक्त महानगर पालिका<br>औरंगाबाद यांचे प्रतिनिधी. | सदस्य प्रतिनिधी |

मा. सभापती यांचे परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्रमांक १ :- दिनांक १७/४/२००३ व २१/४/२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.**

दिनांक १७/४/२००३ व २१/४/२००३ रोजी झालेल्या १२६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांता विषयी विस्तृत माहिती मुख्याधिकारी यांनी मंडळास दिली. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी असेही प्रतिपादन केले की, दिनांक १७/४/२००३ रोजीच्या १२६ व्या बैठकीतील विषय क्रमांक ४ (राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत परळी वैजनाथ येथील घोषित झोपडपट्टीतील कामांच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे बाबत) बाबत जो ठराव क्रमांक ७५५ मंडळाने सर्वानुमते पारीत केला या ठरावात खालील मजकूर/बाबीचा समावेश करुन कांही अटीवर प्रशासकिय मान्यता देण्यात यावी म्हणून मुख्य अधिकारी यांनी प्रस्तावित केले.

ज्या आठ झोपडपट्टयांना प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे त्या घोषित झोपडपट्टया नगर परिषदेने २०/४/२००० च्या राजपत्रानुसार दलित वस्ती योजना लागू झाल्यामुळे घोषीत झोपडपट्टयास झोपडपट्टी सुधार कार्यक्रमातून वगळून परळी शहरातील उर्वरीत झोपडपट्टया घोषीत कराव्यात असे ठरले असल्याचे दिदर्शनास आले असल्याने प्रस्तावित झोपडपट्टया फेर घोषीत झाल्या किंवा कसे या बाबत पडताळणी करुन प्रशासकिय मान्यतेचे आदेश पारीत करावेत. या बाबत चर्चे अंती ठराव क्रमांक ७५५ मध्ये वरील मजकूर अंतर्भूत करुन ठरावातील

इतर अटी/मजकूर कायम ठेवण्या बध्दल मंडळाने सर्वानुमते मान्यता दिली. उपरोक्त सुधारणा ठराव क्रमांक ७५५ मध्ये करावी असाही निर्णय मंडळाने घेतला.

उपरोक्त बदलासह मंडळाच्या दिनांक १७/४/२००३ व २१/४/२००३ रोजी झालेल्या १२६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते मान्य केला व खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७५६ :- दिनांक १७/४/२००३ व २१/४/२००३ रोजी झालेल्या १२६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत उपरोक्त बदलासह कायम करण्यात आला.**

**विषय क्रमांक २ :- सहयोग नगर नांदेड येथील विविध योजनांसाठी आरक्षित भूखंड एक रकमी खरेदी पध्दतीवर वाटप करणे बाबत.**

या बाब टिप्पणी विषयी मुख्याधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, मंडळाने दिनांक १५/१/२००३ रोजी दिलेल्या वृत्तपत्रातील जाहिरातीस अनुसरुन फक्त दुकानासाठीच्या आरक्षित असलेल्या एका भूखंडाच्या विक्रीसाठी ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत या तीन निविदांपैकी श्री महेंद्र आठवले यांची निविदा सर्वात जास्त किंमतीची आहे त्यामुळे श्री आठवले यांची रुपये ६७८२/- प्रति चौरस मिटर या दराची सर्वात जास्त किंमतीची निविदा मंजूर करण्यास हरकत नाही. या विषयावर मंडळाने सविस्तर चर्चा केली व चर्चेअंती मंडळाने सहयोग नगर नांदेड, येथील दुकानासाठीच्या आरक्षीत एका भूखंडासाठी प्राप्त झालेली उच्चतम दर रुपये ६७८२/- प्रति चौ.मि. या दराची सर्वात जास्त किंमतीची श्री महेंद्र आठवले यांची निविदा मंजूर करुन सर्वानुमते निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७५७ :- सहयोग नगर नांदेड येथील दूकानासाठी आरक्षित असलेल्या एका भूखंडास निविदाधारक श्री महेंद्र आठवले यांची रुपये ६७८२/- प्रति चौ.मि. या दराची सर्वात उच्चतम दर असलेली निविदा मंजूर करण्यात येत आहे. सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.**

**विषय क्रमांक ३ :-आर २८ सिडको नविन औरंगाबाद येथील रहिवाशी सोसायटी भूखंडाच्या निविदे बाबत.**

या विषयी मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, सदर ६७५.७१ चौ.मि. क्षेत्रफळ असलेल्या सोसायटी भूखंडाच्या निविदेद्वारे विक्रीसाठी दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन निविदाधारकाकडून २ निविदा प्राप्त झाल्या या दोन प्राप्त झालेल्या निविदापैकी नियोजीत रेणुकामाता गृहनिर्माण संस्था औरंगाबाद याची रुपये २३०३.५० प्रति चौ.मि. या दराची निविदा ही मंडळाच्या किमान अपेक्षित दरापेक्षा म्हणजे रुपये २३०३/- प्रति चौ.मि. दरापेक्षा रु. ०.५० पैसे प्रति चौ.मि.ने जास्त आहे म्हणून नियोजीत रेणुकामाता गृहनिर्माण संस्था औरंगाबाद यांची निविदा निर्णयास्तव मंडळासमोर ठेवण्यात आली आहे असे मुख्याधिकारी यांनी सांगीतले. या वेळी मुख्याधिकारी यांनी चर्चेमध्ये असे प्रतिपादन केले की, सदर भूखंडासाठी यापूर्वी निविदा मागविल्या असता त्यावेळीचा दर रुपये २१६/- प्रति चौ.फुट म्हणजेच रुपये २३२४.१६ प्रति चौरस मिटर या दराने प्राप्त झालेली असल्यामुळे त्यादराने उच्चतम निविदाधारक भूखंड खरेदी करण्यास तयार असल्यास त्यांना भूखंड मंजूर करण्यात यावा. यावर मा. सभापती व मंडळाचे सर्व सन्मानिय सदस्य यांनी मंडळाचा फायदा होण्याच्या दृष्टीने उपरोक्त भूखंड नियोजित रेणुकामाता गृहनिर्माण संस्थेस रुपये २३२४.१६ प्रति चौरस मिटर या दराने विक्री करण्यास हरकत

नाही व या दराने जर उक्त संस्था भूखंड घेण्यास तयार असेल तर त्यांना तसे लेखी कळवून व त्याप्रमाणे त्यांचेकडून रुपये २३२४/- प्रति चौरस मिटर दर मान्य असल्याचे लेखी घेवून त्याप्रमाणे त्यांना उपरोक्त संस्थेस भूखंड विक्री करण्यात यावा अशी मान्यता सर्वानुमते दिली.

या विषयावर मंडळाने उपरोक्त प्रमाणे चर्चेअंती असा निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७५८ :- नियोजित रेणुकामाता गृहनिर्माण संस्था औरंगाबाद यांची आर २८ सिडको नविन औरंगाबाद येथील ६७५.४१ चौरस मिटर क्षेत्रफळाच्या भूखंडासाठीची निविदा ही रुपये २३०३.५० प्रति चौरस मिटर दराची जरी असली तरी सदर संस्था उपरोक्त भूखंड रुपये २१६.०० प्रति चौरस फुट म्हणजेच रुपये २३२४/- प्रति चौरस मिटर या दराने घेण्यास तयार झाल्यास त्यांना भूखंड रुपये २३२४/- प्रति चौरस मिटर या दराने विक्री करण्यात यावा.**

**विषय क्रमांक ४ :- सर्वे क्रमांक ७/भाग मूकूंदवाडी औरंगाबाद येथील व्यापारी तसेच रहिवासी भूखंडाची विक्री करण्यासाठी जाहिरात देणे बाबत**

सदर बाब टिपणी विषयी मुख्याधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, मुकुंदवाडी सर्वे नंबर ७/भाग औरंगाबाद येथे जालना औरंगाबाद रोड लगत मंडळाचे सुमारे १००० चौरस मिटर जमिन ब-याच कालावधी पासून मोकळी आहे. या जमिनीवर गृहनिर्माण योजना दुकानांसह राबविण्यासाठी वारंवार जाहिरात देवूनही पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे उक्त जमिनीवर गृहनिर्माण योजना राबविता येवू शकली नाही. सदर जमिन औरंगाबाद जालना रस्त्या लगत असून तिला व्यापारी दृष्टया महत्व आहे. या जमिनीचे महत्व विचारात घेवून तिचे अतिक्रमणापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने तेथे जवळपास गेल्या दोन तीन वर्षापासून खाजगी सुरक्षा नेमलेली आहे. त्यापोटी म्हाडास दरमहा जवळपास रुपये ७५००/- खर्च येत आहे. तेंव्हा हा खर्च थांबविण्यासाठी तसेच या जमिनीत गुंतलेला म्हाडा निधी मोकळा करण्यासाठी सदर जमिनीची विल्हेवाट त्वरीत लावणे भाग असल्यामुळे व सदर जमिनीचे योग्य असे भूखंड पाडून निविदा पध्दतीने विक्री केल्यास मंडळाचा अडकलेला निधी मुक्त होईल म्हणून सदर जमिनीचे १५ व्यापारी भूखंड पाडले असून त्यांची विक्री निविदा पध्दतीने करण्याची बाब मंडळाच्या मंजूरीस्तव ठेवण्यात आली आहे असे मुख्याधिकारी यांनी सांगीतले. तसेच सदरील जमिनीचा निम्नतम दर (Offset price) रुपये ५२१०/- प्रति चौरस मिटर निश्चित केल्याचे सांगीतले. मा. सभापती यांनी सांगीतले की, सदर भूखंड विक्रीसाठी जाहिरात काढल्यानंतर या भूखंडाबाबत औरंगाबाद येथील मोठमोठे दवाखाने, कारखाने, कंपन्या, व वितरक इत्यादिंना पत्राद्वारे कळविण्यात यावे म्हणजे त्यांचे शोरुमसाठी ते निविदा भरु शकतील व त्याद्वारे भूखंडास प्रतिसाद मिळू शकेल मंडळाचे मा. सभापती व सर्व सदस्य यांनी सांगीतले की, उपरोक्त १५ भूखंड निविदेद्वारे विक्री करणेसाठी प्राधिकरणाकडून निश्चित केलेल्या दरासह मंजूरी घेण्यात यावी व प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर भूखंडाची रितसर जाहिरात देण्यापूर्वी प्रस्तुत बाब मंडळासमोर पुन्हा ठेवण्यात यावी व तदनंतर भूखंड विक्री साठी कार्यवाही करावी.

उपरोक्त प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७५९ :- सर्वे क्रमांक ७/भाग मुकूंदवाडी औरंगाबाद येथील १५ व्यापारी तसेच रहिवाशी भूखंडाची निविदा पध्दतीने विक्री करण्यासाठी विक्री साठी निश्चित केलेल्या रुपये ५२१०/- प्रति चौरस मिटर या दरासह मंजूरी देण्यात येत आहे व त्याप्रमाणे मंडळाच्या शिफारसीसह प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवून भूखंड विक्रीसाठी प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात यावी. व प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर भूखंडाची जाहिरात देण्यापूर्वी या योजनेचा सविस्तर तपशील मंडळासमोर ठेवण्यात यावा. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

विषय क्रमांक ५ :- सर्वे नंबर १७/भाग १८/भाग बाभळगांव रोड लातूर येथे अत्यल्प उत्पन्न गटासाठी ३३६ गाळे बांधणे --- निविदेवर निर्णय घेणे बाबत.

या विषयाच्या बाब टिपणी विषयी सविस्तर माहिती मुख्याधिकारी यांनी मंडळास दिली. मुख्याधिकारी यांनी सांगीतले की, लातूर येथील ३३६ गाळे अत्यल्प उत्पन्न गट योजनेच्या बांधकामासाठी मागविण्यात आलेल्या निविदांपैकी कंत्राटदार श्री वी.व्हि.मोरे यांनी योजनेच्या अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा १५.१० टक्के कमी दराने भरलेली निविदा हि निम्नतम दराची आहे. सदर निविदा कार्यकारी अभियंता लातूर यांचे शिफारसींसह मा. उप मुख्य अभियंता औरंगाबाद मंडळ तथा संचालक पीडीसी पुणे यांचे मार्फत मा. मुख्य अभियंता-२/प्राधिकरण यांना सहमतीसाठी पाठविली होती व मा. मुख्य अभियंता-२/प्राधिकरण यांनी सदर निविदा मंडळासमोर ठेवून मंडळाची मान्यता घेण्याच्या अटीवर मंजूर करण्यास सहमती दर्शविली आहे. व अधिकार प्रदानतेनुसार निविदा स्विकृतीचे अधिकार मंडळास असल्यामुळे उपरोक्त कामाची निविदा मंजूरीस्तव मंडळा समोर सादर केली आहे.

मा. सभापती व सर्व सन्माननिय सदस्य यांनी प्रतिपादन केले की, वर नमूद केलेल्या बांधकामाचे कंत्राटदार श्री बि.व्हि.मोरे यांची निविदा योजनेच्या अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा १५.१० टक्के कमी म्हणजे निविदीत रक्कम रुपये १०३२५६१०/- या रकमेची असल्यामुळे बाब टिपणीत नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून स्विकृत करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तुत विषयावर चर्चा झाल्यानंतर चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७६० :- सर्वे नंबर १७/भाग १८/भाग लातूर येथे अत्यल्प उत्पन्न गटातील ३३६ गाळे बांधणेसाठीच्या योजनेच्या प्राप्त निविदा अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा १५.१० टक्के कमी असलेली सर्वात निम्नतम दराची म्हणजे निविदीत रक्कम रुपये १०३२५६१०/- या रकमेची निविदा बाब टिपणीत नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येते सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

विषय क्रमांक ६ :- गट नंबर ६७१ अर्धापूर जिल्हा नांदेड येथे अत्यल्प उत्पन्न गटातील ८६ गाळे व अल्प उत्पन्न गटातील ४२ गाळे बांधण्याच्या निविदेवर निर्णय घेणे बाबत ---

या विषयाच्या बाब टिपणी विषयीची सविस्तर माहिती मुख्याधिकारी यांनी मंडळास दिली. मुख्याधिकारी यांनी सांगीतले की, अर्धापूर जिल्हा नांदेड येथे गट क्रमांक ६७१ या जमिनीवर ८६ गाळे अत्यल्प उत्पन्न गट व ४२ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेतील गाळयांच्या बांधकामासाठी मागविण्यात आलेल्या निविदांपैकी मे. बिल्डवेल कन्स्ट्रक्शन यांनी भरलेली निविदा ही योजनेच्या अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा ७.८६ टक्के जास्त दराने भरलेली आहे. व ही निविदा सर्वात निम्नतम दराची आहे. सदर निविदा कार्यकारी अभियंता लातूर विभाग यांनी कंत्राटदाराने त्यांची निविदा जास्तीची असल्याबाबत दिलेले स्पष्टीकरण ग्राहय धरुन (यात लिड, बोरवेल, व साखर कारखाना क्षेत्र असल्याने मजूर मिळण्यास अडचण इत्यादी ) शिफारस केली आहे व त्यांचे शिफारसीसह मा. मुख्य अभियंता-२/प्राधिकरण यांचेकडे मा. उप मुख्य अभियंता पुणे यांचे मार्फत प्रस्ताव सहमतीसाठी सादर केला होता. व मा. मुख्य अभियंता-२/प्राधिकरण मुंबई यांनी सदर निविदा मंडळासमोर मान्यतेसाठी ठेवून त्यास मंडळाची मान्यता घेवून बाब टिपणीत नमूद केलेल्या अटींवर मे. बिल्डवेल कन्स्ट्रक्शन यांची निम्नतम दराची निविदा अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा ७.८६ टक्के जास्त दराची म्हणजे निविदीत रक्कम रुपये ५६००५१६/- या रकमेची निविदा स्विकृत करावी म्हणून सहमती दर्शविली आहे. व अधिकार प्रदानतेनुसार निविदा स्विकृतीचे अधिकार मंडळास असल्यामुळे निविदा मंडळासमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आल्या आहेत.

मा. सभापती व मंडळाचे सर्व सन्माननिय सदस्य यांनी प्रतिपादन केले की, योजनेतील गाळयांचे निम्नतम कंत्राटदार मे. बिल्डवेल कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा ७.८६ टक्के जास्त दराची असल्यामुळे निविदा बाब टिपणीत नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून स्विकृत करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तुत विषयावर चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७६१ :- गट क्रमांक ६७१ अर्धापूर जि. नांदेड येथे अत्यल्प उत्पन्न गटातील ८६ गाळे व अल्प उत्पन्न गटातील ४२ गाळे बांधणेसाठीच्या योजनेच्या प्राप्त निविदा अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा ७.८६ टक्के जास्त दराची म्हणजे निविदीत रक्कम रुपये ५६००५१६/- या रकमेची निविदा बाब टिपणीत नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येते सदर ठरावाच्या स्थाई करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

विषय क्रमांक ७ :- राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत नांदेड येथील घोषीत झोपडपटटीतील कामाच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे बाबत.

या विषयाच्या बाब टिपणी विषयी मुख्याधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, राष्ट्रीय झोपडपटटी सुधारणा कार्यक्रमांतर्गत नांदेड महानगर पालिकेने शासनाच्या १/१०/१९९९ च्या निर्णयानुसार घोषीत झोपडपटटयामध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठीचे रुपये १२०१४०३५/- चे

अंदाजपत्रक प्रशासकिय मान्यतेसाठी सादर केलेले आहे. शासनाच्या मानकाप्रमाणे अंदाजपत्रके तपासली असता नांदेड महानगर पालिकेने सादर केलेल्या अंदाजपत्रकातील प्रस्तावापैकी परिशिष्ट-अ प्रमाणे फक्त ११३७९६५०/- पर्यन्तच्या कामांना विशिष्ट अटींसह प्रशासकिय मान्यता प्रदान करता येवू शकेल असे मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगीतले. या बाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, बाब टिपणीत नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त कामास प्रशासकिय मान्यता देण्यात यावी.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७६२ :- झोपडपटटी सुधार कार्यक्रमांतर्गत नांदेड येथील सोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे एकूण २२ झोपडपटटी मधील मूलभूत सुविधा पुरविण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकापैकी रुपये ११३७९६५०/- पर्यन्तच्या कामांच्या रक्मेस अटींच्या अधिन राहून प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर ठरावाच्या स्थाईकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

वरील प्रमाणे पटलावरील विषय संपल्या नंतर मा. सभापती व सर्व सन्माननीय सदस्यांनी खालील प्रमाणे बैठकीत मुद्दे उपस्थित केले त्यावर कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या.

१. मा. सभापती यांनी सांगीतले की, मंडळाच्या कार्यालयातील विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होतो तसेच आठवडयातून कांही वेळेस भार नियमन असल्यामुळे कार्यालयातील विद्युत पुरवठा अचानक खंडीत होतो. परिणामी मंडळाच्या कामात व्यत्यय येतो व संगणक, दुरध्वनी, पी.बी.एक्स., मंडळाच्या सभागृहातील विद्युत पुरवठा, पाणीपुरवठा इत्यादी महत्वाच्या व्यवस्था बंद पडून कामात व्यत्यय येतो. ही होणारी गैरसोय टाळण्यासाठी मंडळाचे कार्यालयात एक जनरेटर/इनव्हर्टर तात्काळ खरेदी करणे आवश्यक आहे. कारण इनव्हर्टर/जनरेटरमुळे विद्युत पुरवठा सुरळीत राहील. यावर मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य यांनीही जनरेटर/इनव्हर्टर तात्काळ खरेदी करावे असे सुचविले. म्हणूनमंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला की, कामाची निकड लक्षात घेता मुख्याधिकारी यांनी एक जनरेटर/इनव्हर्टर तात्काळ खरेदी करावे व त्यावर झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी घेण्यासाठी प्राधिकरणास मंडळाच्या शिफारसीसह प्रस्ताव सादर करावा.

२. मा. सदस्य श्री विश्वास उपासे यांनी सुचना केली की, एम.टी.डी.सी.च्या आर्थिक सहाय्याने व त्यांचे जमिनीवर तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी जसे की, तुळजापूर, पैठण, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, अंबाजोगाई, जांबसमर्थ, धुपखेडा, व ऐतिहासिक स्थळ बिबी का मकबरा, औरंगाबाद येथे म्हाडाच्या सहाय्याने भक्त निवास बांधण्यात यावे यासाठी म्हाडास भक्त निवास बांधण्याचे काम मिळेल व यासाठी एम.टी.डी.सी. मार्फत जमिन व लागणारा खर्च देण्यात येणार आहे म्हणून या संदर्भात एम.टी.डी.सी.बरोबर एक बैठक घेवून व चर्चाकरुन सदर कामा बाबत मंडळातर्फे माहिती मिळविण्यात यावी असेही मा. श्री उपासे यांनी सुचविले. या विषयी मा. सभापती व सर्व सन्माननीय सदस्य यांनी सांगितले की, उपरोक्त बाबतीत एम.टी.डी.सी. च्या अधिकाऱ्या सोबत मुख्याधिकारी यांनी तात्काळ बैठक घ्यावी व भक्त निवास बांधणे विषयीची माहिती मंडळाच्या आगामी बैठकीत ठेवण्यात यावी. या बाबत मुख्याधिकारी यांनी सांगीतले की, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन मंडळाच्या आगामी बैठकीत माहिती सादर करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी यांनी सर्व सन्माननीय सदस्यांना बैठकीत सांगीतले की, त्यांचे जिल्हया अंतर्गत ज्या ज्या ठिकाणी गृहनिर्माण योजना राबविणे योग्य व व्यवहार्य वाटत असेल त्या त्या ठिकाणाची नांवे त्यांनी १५ दिवसाचे आत मुख्याधिकारी यांचेकडे पत्राद्वारे द्यावीत म्हणजे त्यानंतर अशा ठिकाणी खाजगी जमिनीची पाहणी करुन व निवड करुन जमिन

खरेदीची प्रक्रिया पुर्ण करुन घरकुलासाठी जाहिरात देण्याची कार्यवाही करणे सुलभ होईल. मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत सुचना दिल्या की, ज्या ठिकाणी घरकूल योजनांना ठोस मागणी प्राप्त झाली आहे त्या ठिकाणी योजना तात्काळ सुरु करण्यात याव्यात.

४. मा. सदस्य श्री वाघचौरे, श्री जे.पी.पाटील व श्री इनामदार यांनी सांगीतले की, लोक आवास योजना/वॅम्बे योजनेतील लाभार्थींची यादी निश्चित करतांना मंडळाचे उप अभियंता यांनी त्या त्या जिल्हयाचे मंडळाचे सदस्यांना लाभार्थींची यादी दाखवून यादी निश्चित करण्याची कार्यवाही करावी. मुख्याधिकारी यांनी सांगीतले की, वॅम्बे/लोक आवास योजने मधील लाभार्थींची यादी मंडळाचे त्या त्या जिल्हयाचे सदस्यांना दाखवून त्यांचे सहमतीने यादी बाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी सर्व उप अभियंता यांना सुचना देण्यात येतील.

५. मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत सांगीतले की, ग्रामिण भागात प्रत्येक ग्राम पंचायतीच्या सरपंचाना मंडळाच्या योजनांची माहिती व्हावी म्हणूनमराठवाडयातील सर्व ग्राम पंचायतीचे सरपंच यांना पत्र पाठवून माहिती कळवावी. मा. इनामदार यांनी सांगीतले की, ग्राम पंचायतीच्या सरपंच उप सरपंच यांना हॅन्ड आऊट काढून देखील त्या त्या जिल्हयाच्या सदस्यांच्या वतीने माहिती देण्यात यावी. व या साठी लागणारा सर्व खर्च मंडळाच्या वतीने करण्यात यावा. परंतु चर्चेअंती मा. सभापती व सदस्यांनी निर्णय घेतला की, पहिल्या टप्प्यात मराठवाडयातील सर्व सरपंच यांना पत्र पाठवून माहिती द्यावी व दुसऱ्या टप्प्यात हॅन्ड आऊट छापून माहिती द्यावी व हे पत्र पाठविण्यासाठी व हॅन्ड आऊट साठी अंदाजे अपेक्षीत खर्च रुपये १.५० लक्ष खर्च करण्यासाठी प्राधिकरणास प्रस्ताव पाठवून मंजूरी घेण्यात यावी. असे बैठकीत ठरले. मुख्याधिकारी यांनी बैठकीत सांगीतले की, वरील प्रमाणे खर्च करण्यासाठी प्राधिकरणाची मंजूरी घेण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येईल.

६. मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री वाघचौरे व जे.पी.पाटील यांनी सांगीतले की, शहानूरवाडी येथील उच्च उत्पन्न गट योजने अंतर्गत चालू असलेल्या योजनेतील गाळे बांधून पुर्ण करण्यास विलंब होत आहे त्यामुळे ठेकेदारावर दंडणीय कार्यवाही करण्यात यावी तसेच गाळे बांधून पूर्ण होण्यास विलंब झाल्यास/ठराविक मुदतीत योजना बांधून पूर्ण न झाल्यास त्या बाबत लाभधारकाकडून तक्रारी झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदारावर निश्चित करण्यात यावी. संबंधीत कंत्राटदारावर सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतूदीनुसार दंडनिय कार्यवाही करण्यात यावी व कंत्राटदाराचे नांव काळयायादीत का समाविष्ट करुनये याचीही नोटीस कंत्राटदारास देण्याचा निर्णय मंडळाने सर्वानुमते घेतला. उपरोक्त प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्या बाबत कार्यकारी अभियंता यांना कळविण्यात यावे.

७. मा. सदस्यांनी प्रतिपादन केले की, भोकरदन येथील गृहनिर्माण योजनेचे काम सुरु करुन प्रगतीपथावर नेण्यात यावे. यावर मुख्याधिकारी यांनी सांगीतले की, कार्यकारी अभियंता औरंगाबाद यांना काम त्वरीत सुरु करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

८. मंडळातर्फे गाळे भूखंड विक्रीच्या व कामांच्या निविदांच्या ज्या जाहिराती प्रसिध्द होतात त्याची एक प्रत मंडळाचे सर्व सदस्य यांना देण्यात यावी अशा सुचना मा. सभापती यांनी दिल्या. यावर मुख्याधिकारी यांनी सांगीतले की, जाहिरातीची एक प्रत सर्व सन्माननीय सदस्यांना देणे बाबत संबंधीतांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

९. मा. सभापती यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, ग्रामिण भागात मंडळाच्या गृहनिर्माण योजना लवकरात लवकर सुरु करण्याच्या कामासाठी व जिल्हया अंतर्गत मंडळाचे विविध कामासाठी जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांना (उप अभियंता) एक जिप उपलब्ध करुन देण्यासाठी प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा. मुख्याधिकारी यांनी बैठकीत सांगीतले की, या विषयी सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल.

१०. मंडळाच्या सदस्या श्रीमती शैलजा गायकवाड यांनी प्रतिपादन केले की, मंडळाचे परभणी येथील योजनेतील रिक्त गाळे ५० टक्के किंमत कमी करुन विकण्याचा प्रयत्न करावा. यावर मा. मुख्याधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, परभणी येथील गाळे विक्रीसाठी प्राधिकरणाने पूर्वी कमी केलेल्या किंमती पेक्षाही ५० टक्क्या पर्यन्त किंमती कमी करुन गाळयांची विक्री करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. मा. सभापती व सर्व सदस्यांनी सांगीतले की, परभणीसहीत इतर ठिकाणीही मंडळाचे जे गाळे मागणी अभावी रिक्त आहेत उदा. गेवराई, नांदेड, उदगीर इत्यादी ठिकाणी त्याच्याही किंमती वरील प्रमाणे कमी करुन त्या गाळयांचीही विक्री करण्याचा प्रयत्न करावा. मुख्याधिकारी यांनी सांगीतले की, नांदेड, गेवराई, उदगीर इत्यादी ठिकाणी रिक्त असलेले गाळे ५० टक्के पर्यन्त किंमती कमी करुन त्यास रितसर प्राधिकरणाची मंजूरी घेऊन विक्री करण्याची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.

वरील प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून मा. सभापती यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.